


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६९६. वा | शनिवार | दि.०२ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# उद्धव ठाकरेंना भाजपाची ऑफर? देवेंद्र फडणवीस...



**वृत्तसंस्था/मुंबई**

महाविकास आघाडी स्थापन करुन उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री होणं हा भाजपाच्या पाठीत खंजीर खुपसला आहे अशी टीका आत्तापर्यंत देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. तसंच २०२२ मध्ये जेव्हा उद्धव ठाकरेंना राजीनामा द्यावा लागला आणि राज्यात शिंदे-फडणवीस सरकार आलं तेव्हाही मी बदला घेतला असं देवेंद्र फडणवीस म्हणाले होते. आता संजय राऊत यांनी उद्धव ठाकरेंना भाजपा पुन्हा ऑफर देते आहे असा दावा केला. या दाव्यावर देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुलाखतीत असंही म्हटलं आहे की भाजपा पक्ष फोडते असं तुम्ही का म्हणता? ज्या लोकांची पक्षात घुसमट होते, जीव गुदमरतो त्यांना वाटतं की विकासासाठी आम्ही भाजपासह गेलं पाहिजे. अशावेळी जर बडा नेता भाजपात येत असेल आणि आमची ताकद वाढत असेल तर आम्ही त्यांना नाही कसं म्हणणार? अशोक चव्हाण भाजपात आले आहेत. नांदेडमधला इतका मोठा नेता भाजपात येतो आहे, मोदींचं नेतृत्व स्वीकारतो तर नाही कसं म्हणणार? बरं ज्या नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत त्यातून त्यांचं त्यांनी सुटायचं आहे. अशोक चव्हाण एक खटला हायकोर्टात जिंकले आहेत. आता सर्वोच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे, असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. संजय राऊत असं म्हणाले की दिल्लीतले भाजपाचे काही नेते म्हणत आहेत की उद्धव ठाकरेंनी आमच्याबरोबर यावं आपण एकत्र येऊ आमची चूक झाली. याबाबत विचारलं असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, संजय राऊत अजूनही बेशुद्धच आहेत का? संजय राऊत यांना अशी स्वप्नं पडत असतील तर आश्चर्यच आहे. दुसरं असं की आमच्याकडे दिल्लीत असे काही नेते नाहीत जे जाळं घेऊन कुणाच्या मागे जातात. महाराष्ट्राचा काही विषय असेल तर मला विचारलं जातं. मला कुणीही विचारलेलं नाही. उद्धव ठाकरेंवर जाळं टाकायचं का? हे मला कुणीही विचारलेलं नाही. अशा प्रकारचं जाळं टाकण्यात आलं आहे हे स्वप्न जरी संजय राऊत यांना पडलं असलं तरीही मला ती वस्तुस्थिती वाटत नाही. संजय राऊत असंही म्हणाले की आता उद्धव ठाकरे जर भाजपासह गेले तर ठाकरे कुटुंबावरचा विश्वास उडेल, असं ते म्हणाले, याबाबत विचारलं असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, ज्या दिवशी महाविकास आघाडीसह जाण्याचा निर्णय उद्धव ठाकरेंनी घेतला त्यादिवशीच लोकांचा विश्वास उडाला. बाळासाहेब ठाकरेंवर जो विश्वास जनतेने टाकला होता तोच विश्वास जनतेने उद्धव ठाकरेंवर टाकला होता. ते महाविकास आघाडी बरोबर गेले तेव्हा ठाकरेंवरचा विश्वास कमी झाला आहे. आता काय बाकी आहे? संजय राऊत जे बोलले ते घडून गेलं आहे. आता उद्धव ठाकरेंची विश्वासार्हता कमी झाली आहे. असंही म्हटलं होतं की मतभेद संपवता येतात, पण मनभेद संपवणं कठीण असतं. ज्या प्रकारे उद्धव ठाकरे मोदींवर टीका केली आहे, जे शब्द वापरले आहेत, जे आमच्याशी वागले आहेत. त्यांचं सरकार असताना माझ्यासही सगळ्यांना टार्गेट करण्याचा प्रयत्न केला त्यामुळे मनभेद झाले आहेत. आता त्यांना बरोबर घेणं शक्य नाही.असं देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. एक वृत्तवाहिनींच्या मराठीच्या संग्राम लोकसभेचा या कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस यांनी हे म्हटलं आहे.

# आ. संजय गायकवाड यांचा भर मिरवणुकीतील युवकाला बेदम मारहाणीचा व्हिडीओ व्हायरल...

**जनसंचलन/बुलढाणा**

आमदार संजय गायकवाड यांनी १९ फेब्रुवारीला शिवजयंतीच्या मिरवणुकीत पोलिसांच्या काठीने एका युवकास बेदम झोडपल्याचा व्हिडीओ शुक्रवारी समाजमाध्यमावर व्हायरल झाला. त्यामुळे आमदाराच्या दादागिरीबद्दल तीव्र संताप व्यक्त होत आहे. आमदार गायकवाड हे काही दिवसांपासून वादात आहेत. याच आठवड्यात शिकार केलेल्या वाघाचा दात गळ्यात घालण्यासोबतच एका महिलेची शेती हडप केल्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत. असे असतानाच आता एका तरुणाला बेदम मारहाण केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्याने पुन्हा त्यांच्या दादागिरीचा प्रकार समोर आला आहे. संबंधित व्हिडीओ हा १९ फेब्रुवारीच्या शिवजयंती मिरवणुकीचा आहे. यामध्ये एका युवकास पोलिसांनी धरलेले असताना आमदार गायकवाड हे पोलिसाच्या हातातील काठी हिसकावून स्वत:च त्या युवकास बेदम मारहाण करीत आहेत. पोलिस त्यांचे कर्तव्य निभावत असताना लोकप्रतिनिधीने कायदा हातात घेऊन अशा प्रकारची दादागिरी केल्याबद्दल नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. १९ फेब्रुवारीच्या या प्रकाराबद्दल पोलिसांमध्ये कुठलीही तक्रार दाखल झालेली नाही. मात्र या व्हायरल व्हिडीओनंतर कारवाई होणार का? असा प्रश्न विरोधी पक्षाने विचारला आहे. पोलिसांकडे अद्याप कुठलीही तक्रार आलेली नाही. मात्र तक्रार आल्यास संपूर्ण शहानिशा व कायदेशीर बाबींची तपासणी करून निश्चितच गुन्हा दाखल करण्यात येईल. विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आ.गायकवाड हे मारहाण करीत असल्याच्या व्हायरल व्हिडीओबाबत उद्वेग व्यक्त करणारी पोस्ट एक्सवर केली आहे.



ते म्हणतात, किती बोलायचं?, किती प्रकरणं रोज दाखवायची? या व्हिडीओत तरुणाला अमानुष मारहाण करणारी व्यक्ती ही काही मामुली गुंड नाही. मारहाण करणारी व्यक्ती मुख्यमंत्र्यांच्या गटाची आमदार आहे. हवेत गोळीबार, एकमेकांवर गोळीबार, एकमेकांना लाथाबुक्क्या मारून सुरू असलेलं महायुतीचं विकासाचं राजकारण आता जनतेला लाठ्या काठ्यांनी झोडपून काढण्यापर्यंत पोहोचलं आहे.

# २७ वर्षीय विवाहितेची आत्महत्या



**जनसंचलन/मलकापूर**

माहेरी आलेल्या २७ वर्षीय विवाहितेने २९ फेब्रुवारी रोजी बहापुरा रेल्वे गेटजवळ रेल्वे लाईनवर मालगाडीखाली झोकून देत आत्महत्या करीत आपले जीवनयात्रा संपविली.याबाबतची अधिक माहिती अशी की, तालुक्यातील वडोदा येथील रहीवासी ह.मु. जाधववाडी मलकापूर येथील सुभाष राठी यांची मुलगी हिचा विवाह तीन वर्षांपूर्वी खामगाव तालुक्यातील माटरगाव येथील गौरव गांधी यांचेसोबत झाला होता. ती आपल्या नवऱ्यासह विमाननगर पुणे येथे वास्तव्यास होती. गेल्या काही दिवसापासून ती माहेरी जाधववाडी मलकापूर येथे आली होती. २९ फेब्रुवारी रोजी राखीने मध्य रेल्वेच्या बहापुरा रेल्वे गेटनजीक स्वत:ला रेल्वे मालगाडीखाली झोकून देत आत्महत्या केली. घटनेची माहिती ग्रामस्थांनी पोलिसांना दिली. त्यावरून पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे.

# विशेष पोस्ट कव्हरमुळे जिल्ह्याच्या पर्यटनाला चालना मिळणार-खासदार प्रतापराव जाधव

## एकाचवेळी सहा पोस्ट कव्हरचे अनावरण....




**जनसंचलन/ बुलढाणा**

जिल्ह्यात पर्यटनाच्या दृष्टीने विविध स्थळे आहेत. मात्र या स्थळांचा विकास करून प्रचार-प्रसिद्धी करणे आवश्यक आहे. जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेऊन डाक विभागामार्फत विशेष पोस्ट कव्हर प्रकाशित केले आहे. या पोस्ट कव्हरमुळे जिल्ह्यातील सहा पर्यटनस्थळांची माहिती जगभरात होणार आहे. यातून जिल्ह्याच्या पर्यटनाला चालना मिळणार आहे, असे प्रतिपादन खासदार प्रतापराव जाधव यांनी केले. जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने प्रकाशित जिल्ह्यातील ऐतिहासिक, पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या स्थळांवरील सहा विशेष पोस्ट कव्हरचे अनावरण पार पडले. यावेळी पोस्ट मास्तर जनरल शोभा मधाळे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, डाकघर अधीक्षक गणेश आंभोरे, जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार आदी उपस्थित होते. खासदार श्री. जाधव म्हणाले, पोस्ट विभागाने नाविण्यपूर्ण योजना राबवून आणि इतर विभागांची साथ घेऊन कात टाकली आहे. गाव पातळीपर्यंत पोस्ट बँक पोहोचलेली आहे. तसेच विशेष डाक तिकीट आणि विशेष पोस्ट कव्हरमुळे जिल्ह्यातील विविध पर्यटनस्थळांची माहिती जगभरात होण्यास मदत मिळेल. एकाचवेळी सहा पोस्ट कव्हरचे अनावरण हा प्रसंग पहिल्यांदाच घडून आला आहे. यानिमित्ताने सहा पर्यटनस्थळे आणि इतरही ठिकाणे पर्यटनाच्या नकाशावर येण्यास मदत होईल. त्यामुळे पोस्ट विभागाने याकामी केलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. श्रीमती मधाळे यांनी पोस्ट विभागातर्फे विविध योजना राबविण्यात येत असल्याचे सांगितले. फिलाटेलीच्या माध्यमातून ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्वाच्या ठिकाणांवर स्पेशल पोस्ट कव्हर प्रकाशित करण्यात येत आहे. यामुळे या स्थळांची माहिती जगभरात होण्यास मदत मिळणार असल्याचे सांगितले. जिल्ह्यात पर्यटनाच्या दृष्टीने इतरही ठिकाणे आहेत, याची माहिती फिलाटेलीच्या माध्यमातून समोर यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले, जिल्ह्यातील पर्यटनस्थळांचा विकास करण्यात येत आहे. या पर्यटनस्थळांची माहिती राज्यात इतर ठिकाणी व्हावी, यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणे ही पर्यटनदृष्ट्या महत्वाची आहेत. त्यांची माहिती झाल्यास याठिकाणी पर्यटक येऊन जिल्ह्यातील पर्यटनास वाव मिळेल. जिल्ह्यातील शेगाव विकास आराखडा पूर्णत्वास आला आहे. लोणार आणि सिंदखेड राजा विकास आराखडा तयार करण्यात आला असून विकासकामांना सुरवात झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यात सर्वांगसुंदर पर्यटनस्थळे तयार होण्यास मदत होईल. तसेच लोणार सरोवर हे जागतिक वारसास्थळाच्या यादीत यावे, यासाठी प्रक्रिया करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार यांनी प्रास्ताविकातून राजमाता माँ जिजाऊसाहेब, लोणार सरोवर, दैत्यसूदन मंदिर, कमलजा देवी मंदिर, संत श्री गजानन महाराज मंदिर, आंबाबरवा अभयारण्य या पर्यटनस्थळांवर विशेष पोस्ट कव्हर तयार करण्यात आल्याचे सांगितले. डाक अधीक्षक गणेश आंभोरे यांनी आभार मानले.

# शेतकऱ्यांच्या समस्या सोडवा अन्यथा लोकसभा मतदानावर बहिष्कार...

## बळीवंश लोकचळवळ करणार प्रत्येक गावा गावात जनजागृती

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

सिंदखेड राजा मतदार संघातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या सातत्याने बळीवंश चळवळी च्या माध्यमातून आम्ही प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मांडत असून शेतकरी हा देशाचा कणा असून शेतकऱ्यांच्या समस्या तात्काळ सोडवून शेतकऱ्यांना न्याय द्यावा अन्यथा येणाऱ्या लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकून याबाबतची जनजागृती प्रत्येक गावा गावा त करणार असल्याचे बळी वंश चळवळी चे नितीन कायंदे यांच्या बळी वंश चळवळी कार्यकर्त्यांने करणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

सिंदखेड राजा मतदारसंघात जवळपास ९० % मतदार हा शेतकरी आहे परंतु असे निदर्शनास येत आहे की वर्षानुवर्षे त्याच त्याच समस्या शेतकऱ्यांना भेडसावत आहेत व दरवर्षी नवं नविन संकटांची त्यात भर पडत आहे. कितीही वेळा शासन दरबारी या समस्या मांडल्या तरी त्यावर कसलाही तोडगा निघताना दिसत नाही. आम्ही राष्ट्रमाता स्वराज्य जननी मा जिजाऊ यांच्या भूमीतील स्वाभिमानी शेतकरी आहोत त्यामुळे या सरंजाम शाहीला नक्कीच खंबीर मोडून काढू. खालील समस्यांवर काहीतरी ठोस तोडगा निघावा अशी आशा आहे

मागील सर्व थकीत रकमा शेतकऱ्यांना तात्काळ अदा करण्यात याव्यात त्यामध्ये २०२१ ते २०२३ चे दुष्काळ निधी, अतिवृष्टी मदत व नोव्हेंबर २०२३ चे गारपीट व २७ फेब्रुवारी २०२४ ला झालेल्या गारपीट ग्रस्त शेडधारक तथा शेतकऱ्यांना निधी वाटप तात्काळ करावे.

पंतप्रधान तथा मुख्यमंत्री शेतकरी सन्मान निधी पासून वंचित शेतकऱ्यांचा सर्वे करून त्यांना तात्काळ या योजनेत सहभागी करावे. सोयाबीन, कापूस व हरभरा चे दर वाढविण्यासंदर्भात शासनाने ठोस उपाययोजना कराव्या,कारण दरवेळी आंतरराष्ट्रीय दर बाबत पळवाट सरकार काढू शकत नाही,

वन्यप्राणी साठी असणाऱ्या उपाययोजना शासनाने अधिक कठोर कराव्या, ज्या मध्ये रोही या प्राण्याला पारध करण्याची परवानगी द्यावी व नुकसान भरपाई देण्याची पद्धत बदलावी, शेतकऱ्यांना अर्ज करून ६-६ महिने झाले आहेत तरी मदत मिळाली नाही, त्यांना ती मदत सव्याज तात्काळ मिळावी.

सद्या आपला भाग भूगर्भ विभागाच्या अनुसार सेमी क्रिटिकल झोन मध्ये येतो त्यामुळे अंतर्गत वैयक्तिक विहीर खोदण्यास बंदी आहे परंतु दुसरीकडे सामूहिक विहिरींना मात्र तातडीने परवानगी मिळत आहे, त्याच धर्तीवर वैयक्तिक विहिरींना देखील परवानगी द्यावी.

६ अनेक योजनासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावे लागतात त्यासाठी शेतकरी संपूर्णतः केंद्रावर अवलंबून असतो, अनेक केंद्राचालक सहकार्य करतात परंतु काही जण मनाला येईल तसे भाव लावून शेतकऱ्यांची लूट करत आहेत त्यासाठी संबंधित यंत्रणेने दरपत्रक प्रत्येक केंद्रावर लावावे व याची काटेकोर अंमलबजावणी करावी. तसेच प्रत्येक ग्रा प कार्यालयात मोफत केंद्र सुरू करावे.

७ शेतमाल वाहतूक करणाऱ्या वाहनांना समृद्धी महामार्गावर टोल माफी द्यावी.

८ ज्या ज्या परिसरात दुष्काळ जाहीर केलेला आहे त्या परिसरात वेगळे निकष, पंचनामे न करता सारसगट पीकविमा शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा.

१० शेतकऱ्यांना सरसगट कर्जमाफी द्यावी तसेच नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५०००० रु प्रोत्साहनपर भत्ता द्यावा या समस्येवर ठोस तोडगा काढून तात्काळ उपाययोजना कराव्यात अन्यथा आम्ही येत्या लोकसभा निवडणुकीत मतदानावर सामूहिक बहिष्कार टाकू. असा इशारा बळीवंश चळवळी च्या कार्यकर्त्यांनी केला आहे.

# ठाणेदाराच्या अवैध धंदे बंद करण्याच्या लेखी आश्वासनाने माजी सरपंच साबेर पठान यांच्या उपोषणाची सांगता



**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

सिदखेड राजा तालुक्यातील साखरखेर्डा पोलीस स्टेशन अंतर्गत गावागावात सुरू असलेले अवैध धंदे तात्काळ बंद करावे यासाठी भाजप कोअर कमिटीचे सदस्य माजी सरपंच साबेर पठाण यांनी साखरखेर्डा येथे उपोषण सुरू केले होते याची दखल घेत ठाणेदाराने अवैध धंदे बंद करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने साबेर पठान यांच्या उपोषणाची यशस्वी सांगता करण्यात आली साखरखेर्डा पोलीस स्टेशन च्या हद्दीत असलेल्या अवैध धंदे बंद करावे यासाठी साखरखेर्डा येथे आज शुक्रवारला उपोषण सुरू करण्यात आले होते या उपोषणाला माजी आमदार तोताराम कायंदे यांनी भेट देऊन ठाणेदार चर्चा केली उपोषणाला वाढती गर्दी बघता पोलिसांनी लगेच अवैध धंदे बंद करण्याचे ठाणेदार यांनी लेखी आश्वासन दिल्याने उपोषणाची यशस्वी सांगता करण्यात आली यावेळी जमादार निवृत्ती पोकळे भाजपचे अल्पसंख्यांक सेलचे तालुकाध्यक्ष शेख जावेद मा पंचायत समिती सदस्य रफिक प्यारे उल्हास देशपांडे तंटामुक्ती अध्यक्ष हानीप बागवान प्रभाकर ताठे माऊली मुंढे ॲड निशिकांत राजे जाधव जालमसिंग ठाकूर आदी स ह अनेक जण उपस्थित होते

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, येथे राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा...

**जनसंचलन/बुलढाणा**

द्वारका बहुउद्देशीय ग्रामीण विकास फाउंडेशन द्वारा संचालित,राजर्षी शाहू अभियांत्रिकी बुलडाणा येथे द्वारका फाउंडेशनचे अध्यक्ष श्री धृपतरावजी सावळे साहेब व प्रबंधक सौ. कीर्तिताई पऱ्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २८फेब्रुवारी २०२४ रोजी विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. प्रसिद्ध भारतीय शास्त्रज्ञ डॉ. सी.व्ही. रमण यांनी केलेल्या रामन प्रभावाचा शोध साजरा करण्यासाठी दरवर्षी २८ फेब्रुवारी रोजी देशात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. या दिवशी सर सीव्ही रामन यांनी रामन इफेक्टचा शोध जाहीर केला. दरवर्षी हा दिवस वेगळ्या थीमने साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे प्रेरित करणे आणि सर्वसामान्यांना विज्ञान आणि वैज्ञानिक कामगिरीची जाणीव करून देणे हा आहे. या दिवशी शाळा, महाविद्यालयांमध्ये अनेक प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात. प्रा. पी.एस.काटकर यांनी याप्रसंगी विध्यार्थ्यांना डॉ. सी.व्ही.रामन यांच्या विषयी व त्यांनी केलेल्या महान शोध कार्यबद्दल माहिती दिली. तसेच या वर्षी राष्ट्रीय विज्ञान दिन २०२४ ची थीम ङ्गविकसित भारतासाठी भारतीय स्वदेशी तंत्रज्ञानफ अशी निश्चित करण्यात आली आहे. २८ फेब्रुवारी १९८७ या दिवशी जगप्रसिद्ध भारतीय शास्त्रज्ञ सीव्ही रमण यांनी रमन इफेक्टचा ( ) शोध लावला होता तेव्हा पासून २८फेब्रुवारी १९८७ पासून हा दिवस विज्ञान दिवस म्हणून साजरा केला जातो . . या शोधासाठी त्यांना १९३० मध्ये नोबेल पारितोषिक मिळाले होते. असे प्रा. बी.व्ही.नरवाडे यांनी सांगितले. तसेच या प्रसंगी प्रा.अजिंक्य कुहिरे यांनी विध्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करून येणाऱ्या काळामध्ये विज्ञान क्षेत्रात मोलाची कामगिरी करावी व विकसित भारतासाठी




भारतीय स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करावे असे प्रतिपादन केले. या प्रसंगी प्रा. पंकज राणे यांनी भारताने आजपर्यंत विज्ञान क्षेत्रात केलेली भरीव कामगिरीचा आलेख विद्यार्थ्यांसमोर मांडला व चांद्रयान मोहिमेत चालू असलेली प्रक्रिया समजून सांगितली. या कार्यक्रमाकरिता प्रा. प्रवीण राणे, प्रा. नितीन पायघन, प्रा. सोनने, प्रा.देशपांडे, प्रा. ऋषी भालेराव, प्रा. सुरडकर, प्रा. नेहा देशमुख, प्रा.किरण सरोदे, प्रा.पल्लवी पट्ठे, प्रा.वैष्णवी चौधरी, कु. रिंढे, श्री पुराणे, कैलास लडके, श्री सिरसाट, श्री शिंदे, श्री, देवकर , श्री. शिंगणे, श्री.मांडवे, योगेश काकडे, व भूषण चितेवर उपस्थित होते.

# श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान च्या वतीने -नागोराव अवतार यांचा सत्कार

**जनसंचलन/ खामगाव**



दि खामगाव एज्युकेशन सोसायटी खामगाव व्दारा संचालित जीवन लाल वीरचंद मेहता श्री गुप्तेश्वर विद्यालय, शिर्ला नेमाने येथील शिपाई पदावर कार्यरत असलेले नागोराव शंकरराव अवतार हे आज दिं २९-२-२०२४ शुक्रवार रोजी सेवा निवृत्त झाले त्यांच्या या निरोप समारंभाच्या कार्यक्रम निमित्त स्थानिक शिवाजी महाराज नगर भागातील श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान च्या वतीने श्री नागोराव शंकरराव अवतार यांचा गणेश माने व नरेंद्र मावळे यांनी शाल, श्री फळ, व बुके देवुन सत्कार केला कुठलीही व्यक्ती पदावर असताना जवाबदारी ची जाणीव ठेवून कायद्या चे अनुपालन करणाऱ्या वर त्या व्यक्तीचे मुल्य ठरते शाळेत शिपाई पदावर जोमाने,निष्ठेने,संयमाने, आणि सर्वाशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करून हसत खेळत चोख प्रदिर्घ सेवेतून आज नागोराव अवतार हे सेवा निवृत्त झाले त्या निमित्ताने त्यांचा सत्कार करण्यात आला व पुढील आयुष्या करीता शुभेच्छा देण्यात आल्या या प्रसंगी प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष माजी नगराध्यक्ष गणेश माने,राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुय्यम निरिक्षक नरेंद्र मावळे, रमाकांत गलांडे, सुभाष शेळके, महेंद्र पाठक, कल्याण गलांडे, प्रतिष्ठान चे प्रसिद्धी प्रमुख देविदास शर्मा, स्वप्नील शहा, सलीम शेख आदींनी शुभेच्छा दिल्या अशी माहिती श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठानचे प्रसिद्धी प्रमुख देविदास शर्मा यांनी दिली आहे

# गाव तेथे महामनवांचे विचार महामानव ग्रुप अभियान व्दारे मांडणार - सुमित गायकवाड

**जनसंचलन/बुलडाणा**

२९ फेब्रूवारी २०२४ रोजी महामानव ग्रुप बुलढाणा जिल्हा ग्रामशाखा डोंगरशेवली येथे शाखा अनावरण सोहळा कार्यक्रम शेकडो युवकांच्या व ग्रामस्थांच्या उपस्थीतीत संपन्न झाला. महामानव ग्रुप च्या अविरत सुरू असलेल्या सामाजिक कार्यावर विश्वास ठेवत महामानव ग्रुप मध्ये गावातील असंख्य युवकांनी प्रवेश केला. देशासाठी झटणाऱ्या तमाम महामानवांची विचारधारा जनमानसात पोहोचवण्यासाठी महामानव ग्रुप हा अभिप्रेत कार्य करतो. असे प्रतिपादन गावातील युवकांनी केले. तमाम बहुजन महामानवांची समतेची मानवतेची विचारांची श्रृंखला समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार युवकांनी यावेळी केला.कार्यक्रमाच्या ठिकाणी असलेल्या युवकांचा उत्साह येणाऱ्या परिवर्तनाची नांदी असल्याचे दाखवून जात होता. महामानव ग्रुप बुलढाणा जिल्हा च्या गाव तिथे शाखा या अभियानाला पुढे नेत ग्रामशाखा डोंगरशेवली येथे असंख्य युवकांच्या उपस्थितीत ङ्गशाखा फलकाचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या सूरुवातिला महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तदनंतर गावातील शाखेचे अध्यक्ष प्रशांत वानखेडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले . तसेच समाधान घुले,पंकज वानखेडे, पवन साळवे, दिपक निकाळजे, शांतपाल वानखेडे, संतोष वानखेडे, आदी सदस्यांनी अतिशय नियोजनबद्ध कार्यक्रम घेण्यात सिंहाचा वाटा उचलला. कार्यक्रमामधे महामानव ग्रुपचे मार्गदर्शक गावचे उपसरपंच राहुलभाऊ गवई यांनी मनोगत व्यक्त करत महामानव ग्रुपच्या सामाजिक कार्याचा आलेख व ध्येय उद्दिष्टे सांगितली. तसेच युवा कवी अजय जाधव यांनी आपल्या विद्रोही कवितेच्या माध्यमातून समाज प्रबोधन करत युवकांमधे उत्साह जागृत केला. त्यांनी कार्यक्रमाला उद्देशून लिहिलेल्या ओळी सादर करतांना , अन्यायाची जखम ज्याला ज्याला भोवली त्यांना न्याय देण्यासाठी उभी आहे डोंगरशेवली इथल्या युवकांनी भीमरायाची कलम आणी शिवरायांची तलवार जपून आहे ठेवली...! ह्या सुंदर रचना प्रस्तुत करून उपस्थितांची मने जिंकली. गावातील महिलांच्या वतीने कार्यक्रमातील मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. तसेच महामानव ग्रुपच्या कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



अध्यक्षीय भाषणात महामानव ग्रुपचे अध्यक्ष सुमित गायकवाड यांनी युवकांना संबोधित करत येणाऱ्या काळात युवकांचे संघटनात्मक जाळे संपूर्ण जिल्हाभरात कसे पुढे जाईल सविधान जागृती, समाजावरील अन्याय अत्याचार जिथे कोणी नाही तीथे आम्ही यावर मार्गदर्शन करत पुढची सामाजिक दिशा स्पष्ट केली. महामानव ग्रुपच्या सामाजिक कार्यावर विश्वास ठेवत शेकडो युवक दिवसेंदिवस महामानव ग्रुप मधे सामील होत आहेत. जिल्ह्यातील गावोगावातून युवा तरुणांचा भरघोस प्रतिसाद आंबेडकरी चळवळीला जिल्ह्यात बळकटी देत आहे. ही बाब फार अभिमानास्पद असून जिल्ह्यातील युवा वर्ग महामानव ग्रुप मधे सामील होत आहे. यापुढेही ही सामाजिक कार्याची श्रृंखला अविरत सुरू राहणार असून ङ्गगाव तिथे शाखाङ्घ हे अभियान राबविणार असल्याचे महामानव ग्रुप कडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# क्रीडा गुण सवलतीसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन



**जनसंचलन/बुलडाणा**

माध्यमिक, उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा देणाऱ्या जिल्हा, विभाग, राज्य स्तरावरील क्रीडा स्पर्धेत प्राविण्य प्राप्त संपादन केलेले, तसेच राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्राविण्य संपादन केलेले, सहभागी झालेले खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव गुण देण्यात येते. त्यानुसार संबंधीत शाळा, खेळाडूंनी दि. २० मार्च २०२४ पूर्वी अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हा, विभागीय, राज्य व राष्ट्रीय त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्राविण्य संपादन, सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांनी परिपूर्ण प्रस्ताव, विहीत नमुन्यात अर्ज, हॉल तिकीट, संबंधित खेळाचे प्रमाणपत्र, शालेय परिशिष्ठ ई, तसेच विविधस्तरावरील क्रीडा स्पर्धेत प्राविण्य संपादन, सहभागी असल्यास, राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर असे क्रमवार प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे. प्रत्येक पृष्ठ मुख्याध्यापक, प्राचार्य यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. सदर अर्ज ऑफलाईन पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे. सेवा हमी कायद्यानुसार ग्रेस गुण देण्याकरीता ऑनलाईन पोर्टल सिस्टीम कार्यरत आहे. राज्य, राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्राविण्य संपादन केलेले, सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव गुण सदरच्या वेबसाईटवर जाऊन विद्यार्थी, खेळाडूंनी प्रथम नोंदणी करुन क्रीडागुण सवलतीचा अर्ज, परिक्षेचे हॉल तिकीट आणि खेळाचे प्रमाणपत्र यासोबत अपलोड करणे आवश्यक आहे. सदरच्या प्रस्तावाची हार्डकॉपी २ प्रतीमध्ये सादर करावी लागणार आहे. क्रीडा स्पर्धा एकविध खेळ संघटनांद्वारे आयोजित केले असल्यास संघटना परिशिष्ट-१० सोबत, विहित नमुन्यात अर्ज, हॉल तिकीट, मान्यताप्राप्त खेळाचे प्रमाणपत्र, शालेय परिशिष्ठ-ई आदीसह संबंधित शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक, प्राचार्य यांनी खेळाडूंचे परिपूर्ण प्रस्ताव सादर करावे लागणार आहे. एकविध खेळाच्या अधिकृत संघटनांनी जिल्हास्तर, विभागस्तर, राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे अहवाल . या ई-मेलवर पाठवावे लागणार आहे. याबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.

# निष्ठेच्या शिदोरीवरच राजकारणात पुढे वाटचाल - जालिंदर बुधवत

## वाढदिवसानिमित्त पार पडले सेवा कार्याचे विविध कार्यक्रम



**जनसंचलन/बुलढाणा**

संकट संधी घेऊन येत असतं. शिवसेनेमुळे आपल्यासारख्याला नाव मिळालं. सामाजिक, संघटनात्मक किंवा राजकीय पदांवर जिथे जिथे काम करण्याची संधी मिळाली तिथे आपण प्रामाणिक आणि निष्ठेनेच काम केले. बाजार समिती असो वा अन्य ठिकाणी विकासाचा याची देही याची डोळा अनुभव घेता येतो. मातोश्रीचा आदेश हेच आपल्यासाठी सर्वस्व आहे. निष्ठाबळाच्या याच शिदोरीवर राजकारणात पुढील वाटचाल कायम राहील, अशी ग्वाही शिवसेना जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांनी दिली. २९ फेब्रुवारी रोजी विविध सामाजिक उपक्रमांनी जालिंदर बुधवत यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. दिवसभर त्यांना भेटण्याऱ्यांची आणि शुभेच्छा देणाऱ्यांची गर्दी होती. विविध ठिकाणी अन्नदानाचे कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रमांना हातभार हा दरवर्षीचा शिरस्ता या वर्षी देखील जालिंदर बुधवत यांच्या मित्रमंडळाने कायम ठेवला. सकाळी थड तालुका मोताळा येथे महाआरती करण्यात आली. विष्णुवाडी येथे गजानन महाराज मंदिरात शिवसेना जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत व कुटुंबीयांनी महाआरती केली. तसेच विष्णुवाडी निवासस्थानी वरूड ता. बुलढाणा येथील दिंडीतील वारकऱ्यांना वस्त्रदान जालिंधर बुधवत यांच्या हस्ते करण्यात आले. रक्तदान शिबिरात १०५ जणांनी रक्तदान करून राष्ट्रीय कार्यात सहभाग घेतला, उप जिल्हा प्रमुख सुनील घाटे यांच्याकडून लाडूतुला तर जिल्हा संघटक प्रा. गोपाल बच्छिरे यांच्याकडून लाडूतुला व जेसीबी द्वारे मोठा हार टाकून बुधवत यांचे स्वागत, सत्कार करण्यात आला. पळसखेड येथील सेवा संकल्प आश्रमात भोजन सेवा देण्यात आली. बुलडाणा येथील मुकबधीर शाळेत विद्यार्थ्यांना अन्नदान कार्यक्रम, मासरूळ ता. बुलडाणा येथे वृक्षारोपण, तसेच कुलमखेड ता. बुलडाणा येथे विद्यार्थ्यांना खाऊ वाटपाचा कार्यक्रम जालिंदर बुधवत यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने पार पडले.

# सागाची अवैध साठवणूक करणाऱ्यास वनविभागाने केली अटक...



**जनसंचलन/ मोताळा**

सागवनची अवैध साठवणूक करणाऱ्या एकास वनविभागाने १ मार्च रोजी ताब्यात घेतले असून त्याला मोताळा येथील न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यास एका दिवसाची वनकोठडी सुनावली आहे. तालुक्यातील गोतमारा येथील लालचंद राठोड हा सागवनची अवैधरीत्या साठवणूक करीत असल्याची गोपनीय माहिती वनविभागाला मिळाली होती. त्या माहितीच्या आधारावर बुलढाणा वनपरिक्षेत्र अधिकारी अभिजीत ठाकरे, वनपाल एस. डी. वानखेडे, वनरक्षक पी. पी. मुंढे, एम. बी. घुले, एम. जी. बोरकर, संदीप मडावी यांच्यासह वनविभागाच्या पथकाने २३ फेब्रुवारी रोजी गोतमारा येथील लालचंद राठोड यांच्या रंधा मशीनवर छापा टाकून ओला सागवान २० चौरस नग ०.१५४ घनमीटर अंदाजे १४ हजार पाचशे रुपये, तसेच २६ हजार रुपये किमतीची रंधा मशीन असा एकूण ४० हजार पाचशे रुपयांचा माल जप्त करीत वनगुन्हा दाखल केला होता. यावेळी लालचंद राठोड हा हाती लागला नव्हता. १ मार्च रोजी वनविभागाच्या पथकाने लालचंद राठोड यास ताब्यात घेतले. त्यास मोताळा येथील न्यायालयात हजर केले असता त्यास एका दिवसाची वनकोठडी सुनावली.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार तिघांविरोधात गुन्हा दाखल...

**जनसंचलन/बुलडाणा**

स्थानिक पोलिस स्टेशनअंतर्गत अल्पवयीन मुलीला एका अपार्टमेंटमध्ये डांबून ठेवत सलग १० दिवस अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून संशियत दोन पुरुषांसह एका महिलेवर पोलिसांनी दि. २९ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात संशयित हशीर, दीपक गवई आणि एका महिलेवर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १६ फेब्रुवारीला दुपारी ५ वाजेपासून बेपत्ता झालेली मुलगी २८ फेब्रुवारी रोजी घरी परत आली. तेव्हा तिने तिच्या आईला या संपूर्ण प्रकाराची माहिती दिली. हशीर व एका महिलेने दुचाकीवर बसवून बुलढाणा शहरातीलच एका अपार्टमेंटमधील खोलीत नेले. तेथे दीपक गवई याने १७ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारीच्या दुपारपर्यंत आपल्यावर बलात्कार केल्याचेही तिने आपल्या आईला सांगितले. त्यावरून पीडितेच्या आईने बुलढाणा शहर पोलिसांत तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी संशयित हशीर, दीपक गवई आणि एका महिलेवर अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणे, जिवे मारण्याची धमकी देणे तसेच इतर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याप्रकरणी पोलीस तपास सुरू आहे.

# बालाजी सोसे यांच्या उपोषणाला संदीप शेळकेंचा पाठिंबा!

## शेतकऱ्यांच्या लढ्यात खंबीरपणे साथ देण्याची दिली ग्वाही...



**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

गारपीटग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी पळखेड चक्का येथील बालाजी सोसे यांनी पुन्हा एकदा उपोषणास्त्र उपसले आहे. वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी २९ फेब्रुवारी रोजी उपोषणाला भेट देऊन पाठिंबा दिला. सोसे यांच्या प्रकृतीची त्यांनी विचारपूस केली. शेतकऱ्यांच्या लढ्यात खंबीरपणे साथ देऊ, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिले. सिंदखेडराजा, देऊळगावराजा तालुक्यात २६ नोव्हेंबर २०२३ रोजी वादळी वाऱ्यासह प्रचंड गारपीट झाली होती. यामध्ये शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते. या भागातील शेतकरी मोठ्या प्रमाणात शेडनेडच्या माध्यमातून बीजोत्पादनाची शेती करतात. वादळी वारा आणि गारपिटीमुळे शेडनेटचे मोठे नुकसान या भागात झाले होते. शेडनेट उभारणे हे आधीच खर्चिक असताना झालेल्या नुकसानीमुळे या भागातील शेतकरी संकटात आहे. शेडनेटच्या नुकसानीला बागायती क्षेत्रात समाविष्ट करून या नुकसानीचा पीक विमा मिळावा या मागणीसाठी पळसखेड चक्का येथील शेतकरी बालाजी सोसे यांनी डिसेंबर महिन्यात आमरण उपोषण केले होते. त्यावेळी लेखी आश्वासन देऊन सोसे यांचे उपोषण अधिकाऱ्यांनी सोडवून घेतले होते. मात्र जवळपास ३ महिन्यांचा कालावधी उलटून देखील सरकारकडून शेतकऱ्यांच्या मागण्यांचा विचार झाला नाही. त्यामुळे बालाजी सोसे यांनी २८ फेब्रुवारीपासून पुन्हा आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. शेतकऱ्यांच्या याच मागण्यांसाठी वन बुलडाणा मिशनने देखील सिंदखेडराजा तहसील कार्यालयावर मोर्चा काढला होता. शेडनेट शेतीच्या नुकसानीला एनडीआरएफच्या निकषाप्रमाणे मदत मिळायला पाहिजे. संकटात सापडलेल्या शेतकऱ्याच्या पाठीशी मायबाप सरकारने उभे राहिले पाहिजे. जनतेने निवडून दिले लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चुप्पी साधतात. त्यांनी सरकारला धारेवर धरले पाहिजे. मात्र असे होतांना दिसत नाही. असे सांगून संदीप शेळके यांनी त्यांच्यावर टीकास्त्र सोडले होते.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल (पहिला मजला), जांभरूण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार

डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)